# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१७
### (जाहिरात क्रमांक ५५/२०१७)
# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १६ ते १८ सप्टेंबर, २०१७ या कालावधीत घेण्यात आलेल्या **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१७** च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी जाहीर करण्यात आला आहे. लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती लवकरच मुंबईसह औरंगाबाद, नागपूर व पुणे या किंवा अन्य केंद्रावर घेण्यात येतील. मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेत स्थळावर स्वतंत्ररित्या लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

२. लेखी परीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठी **पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या प्रोफाईलमध्ये ऑनलाईन पध्दतीने लिंक ओपन झाल्यापासून सहा दिवसांच्या आत पाठविणे आवश्यक आहे. केवळ ऑनलाईन पध्दतीने भरलेले पसंतीक्रम विचारात घेण्यात येतील.** अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहित धरला जाईल व तद्नंतर याबाबत उमेदवारांची कोणतीही निवेदने / पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

३. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, लेखी परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात येत आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

४. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-अ व गट-ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा अहवाल, **अर्ज सादर करण्याच्या तारखेचा, म्हणजेच दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र**

**पडताळणीबाबतचा अहवाल व संबंधित क्रीडा प्रमाणपत्र उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील. सदर अहवाल व क्रीडा प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास खेळाडूचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.**

५. प्रस्तुत परीक्षेत अर्हता प्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी, गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविलेल्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र. ३.८. पहावी.)

६. सदरचा निकाल आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

विजया पडते
उपसचिव (परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

मुंबई
दिनांक : ७ एप्रिल, २०१८